क्र.का-३/संगणकीकरण/विद्युतीकरण/५६८/२०११.
नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक,
महाराष्ट्र राज्य,पुणे यांचे कार्यालय,पुणे
दिनांक : ०९/१२/२०११

प्रति,
सर्व नोंदणी उपमहानिरीक्षक
सर्व सह जिल्हा निबंधक

**विषय :-** दुय्यम निबंधक कार्यालयात सरिता-३ प्रणाली कार्यान्वित करण्याच्या दृष्टीने शासकीय जागेत कार्यरत कार्यालयांमध्ये आवश्यक विद्युतीकरण करण्याबाबत.

राज्यातील सर्व दुय्यम निबंधक कार्यालयांच्या सुशोभिकरणाची मोहीम हाती घेण्यात आली असून त्यामध्ये शासकीय जागेत कार्यरत कार्यालयांची डागडुजी देखील होणार आहे. तसेच जवळपास सर्व कार्यालयात नव्याने दर्जेदार व सुरक्षीत विद्युतीकरण करणे आवश्यक असल्याचे दिसून आले असल्याने, संपूर्ण कार्यालयाचे विद्युतिकरण होणारच आहे.

मात्र याप्रमाणे सुशोभिकरणाचे व डागडुजीचे काम करतांना कार्यालयात सुरु असलेली संगणकीकृत दस्त नोंदणी कार्यप्रणाली बंद करणे उचित होणार नसल्याने, उक्त काम पूर्ण होईपर्यंत कार्यालयांतर्गत दुस-या कक्षात अथवा आवश्यकते नुसार तात्पुरती स्वतंत्र जागा घेऊन त्या कक्षात / जागेत तात्पुरत्या स्वरुपात सदर संगणकीकृत दस्त नोंदणी कार्यप्रणाली सुरु करणे क्रमप्राप्त आहे व त्याकरीता उक्त कक्षात / जागेत संगणकीकृत दस्त नोंदणी कार्यप्रणालीसाठी आवश्यक विद्युतीकरण करणे क्रमप्राप्त आहे.

शिवाय सरिता-३ आज्ञावलीसाठी आवश्यक नविन संगणक सामुग्री खरेदी करुन दुय्यम निबंधक कार्यालयांना उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. सदर संगणक सामुग्रीचा वापर सुरु करण्याचे दृष्टीने दुय्यम निबंधक कार्यालयातील विद्युतीकरणाचा आढावा घेतला असता, जवळपास सर्व कार्यालयात नव्याने दर्जेदार व सुरक्षीत विद्युतीकरण करणे आवश्यक असल्याचे दिसून आले आहे. तथापी त्यास काही कालावधी लागणार आहे. तोपर्यंत सरिता-३ प्रणालीचा वापर प्रतिक्षाधिन ठेवणे उचित होणार नाही.

या दोन्ही बाबींचा एकत्रीत विचार करुन व सार्वजनिक बांधकाम विभागाचे विद्युत विभागाशी सल्लामसलत करुन आणि प्रकल्प अंमलबजावणी समितीच्या मान्यतेने **शासकीय जागेत कार्यरत** दुय्यम निबंधक कार्यालयांमध्ये सरिता-३ साठी आवश्यक त्याप्रमाणात विद्युतीकरण त्वरीत करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे व त्या दृष्टीने पुढील सूचना देण्यात येत आहेत.

१) दुय्यम निबंधक कार्यालयास नव्याने पुरविण्यात आलेल्या संगणक सामुग्रीचा विचार करुन आवश्यक विद्युतीकरणासंदर्भात दुय्यम निबंधक कार्यालयांची टाईप I, II,III अशी वर्गवारी करण्यात आली आहे. त्यांच्या याद्या अलाहिदा देण्यात आल्या आहेत.

२) सदर कार्यालयांना नव्याने पुरविण्यात आलेल्या संगणक सामुग्रीचा विचार करुन कार्यकारी अभियंता, पुणे विद्युत विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग पुणे यांनी टाईप I, II,III अशी तीन नमुना अंदाजपत्रके तयार केली आहेत ती यासोबत जोडण्यात आली आहेत.

**३) सुशोभिकरणाचे मुख्य काम नजिकच्या कालावधीत सुरु होणार आहे, त्यावेळी कार्यालयातील दस्त नोंदणीचे कामकाज बंद / विस्कळीत होणार नाही याचा विचार करुनच सरिता-३ साठीचे तात्पुरते विद्युतीकरण करावयाचे आहे. त्याकरीता पुढीलप्रमाणे मार्गदर्शक सुचना देण्यात येत आहेत –**

अ) जर कार्यालयामध्ये एकापेक्षा जास्त कक्ष असतील, तर उपरोक्त प्रमाणे तात्पुरते विद्युतीकरण मुख्य नोंदणी कक्षात न करता सोयीनुसार अन्य कक्षात करावे व सरिता-३ त्या अन्य कक्षात कार्यान्वित करावी. नंतर सुशोभिकरणाचे काम सुरु झाल्यानंतर प्रथमतः मुख्य कक्षाचे काम पुर्ण करुन घ्यावे व त्याठिकाणी सरिता-३ कार्यान्वित करावी व त्यानंतर अन्य कक्षाचे सुशोभिकरण सुरु करावे.

ब) जर कार्यालयामध्ये एकच मोठा कक्ष असेल तर ज्या बाजूला मुख्य नोंदणी यंत्रणा असेल त्या बाजूला तात्पुरते विद्युतीकरण न करता सोयीनुसार अन्य बाजूला करावे व सरिता-३ त्या आजूच्या जागेत कार्यान्वित करावी. शक्य झाल्यास मुख्य बाजू व तात्पुरती बाजू यांच्यामध्ये पारटेशन करावे. नंतर सुशोभिकरणाचे काम सुरु झाल्यानंतर प्रथमतः मुख्य बाजूचे काम पुर्ण करुन घ्यावे व त्याठिकाणी सरिता-३ कार्यान्वित करावी व त्यानंतर अन्य बाजूचे सुशोभिकरण सुरु करावे.

क) ज्या कार्यालयांमध्ये एकच छोटा कक्ष असेल व उपरोक्त ब प्रमाणे व्यवस्था शक्य नसेल तेथे सह जिल्हा निबंधकांनी त्वरीत तहसिलदार किंवा सार्वजनिक बांधकाम विभाग यांचेशी संपर्क साधून निव्वळ तात्पुरती जागा उपलब्ध करुन घ्यावी व त्या तात्पुरत्या जागेत उपरोक्त प्रमाणे तात्पुरते विद्युतीकरण करुन घ्यावे व सरिता-३ त्या तात्पुरत्या जागेत कार्यान्वित करावी. नंतर सुशोभिकरणाचे काम सुरु झाल्यानंतर मूळ कार्यालयाचे काम पुर्ण करुन घ्यावे व त्याठिकाणी सरिता-३ कार्यान्वित करावी.

**४) मुद्दा क्र.३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे शासकीय जागेत कार्यरत प्रत्येक दुय्यम निबंधक कार्यालयांबाबत नियोजन सह जिल्हा निबंधकांनी करावे.**

५) सह जिल्हा निबंधक यांनी त्यांचे जिल्ह्याचे कार्यकारी अभियंता / उप अभियंता, विद्युतविभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग यांचेशी त्वरीत संपर्क साधून शासकीय जागेत कार्यरत दुय्यम निबंधक कार्यालयांची (मुद्दा क्र.३ प्रमाणे निश्चित केलेल्या तात्पुरत्या कक्षाची / जागेची) पाहणी करण्याचे नियोजन करुन त्यासाठी आवश्यक व्यवस्था करावी. सदर अभियंत्यांनी सोबतचे नमुना

अंदाजपत्रकातील तांत्रीक तपशीलानुसार त्या त्या कार्यालयांसाठी कार्यालयांच्या आवश्यकता विचारात घेऊन स्वतंत्र अंदाजपत्रके तयार करावीत व सह जिल्हा निबंधकांकडे सादर करावीत. सदर कार्यवाही दि.२०/१२/२०११ पर्यंत पुर्ण करण्यात यावी.

६) सह जिल्हा निबंधक यांनी सदर अंदाजपत्रकांमध्ये सरिता-३ साठी आवश्यक तेवढ्याच विद्युतीकरणाचा समावेश असल्याची खातरजमा करुन, सदर अंदाजपत्रके विभागीय नोंदणी उपमहानिरीक्षक यांचेकडे सादर करावीत व विभागीय नोंदणी उपमहानिरीक्षक यांनी अंदाजपत्रकास कार्यालय निहाय प्रशासकीय मान्यता द्यावी व त्या आदेशाची एक प्रत या कार्यालयास पाठवावी. सदर कार्यवाही दि.२४/१२/२०११ पर्यंत पुर्ण करण्यात यावी. त्यानुसार निधी वितरीत करण्याची कार्यवाही या कार्यालयाडून करण्यात येईल.

७) प्रशासकीय मान्यता आदेश प्राप्त होताच सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी कामास त्वरीत सुरुवात करावी. पहिल्या टप्यात सरिता-३ सुरु करण्यासाठी निवडण्यात आलेल्या १०० कार्यालयांपैकी शासकीय जागेत कार्यरत असणा-या कार्यालयात दि.०५/१/२०१२ पर्यंत व उर्वरीत कार्यालयात दि.१५/१/२०१२ पर्यंत काम पूर्ण करण्यात यावे.

८) ज्या शासकीय जागेतील दुय्यम निबंधक कार्यालयात सोबतच्या अंदाजपत्रकामध्ये नमूद तांत्रीक तपशीलाप्रमाणे व आवश्यक संख्येत पॉईंटस् अलाहिदा उपलब्ध असतील तसेच मुद्दा क्र.३ मध्ये नमूद बाबीची देखील पूर्तता होत असेल त्यामुळे वरीलप्रमाणे विद्युतीकरण नव्याने करण्याची आवश्यकता नसेल तर त्याप्रमाणे कार्यकारी अभियंता / उप अभियंता, विद्युतविभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग यांचे कडून वायरिंगची तपासणी करुन घ्यावी व अर्थिंग योग्य असल्याची खातरजमा करावी व तसे प्रमाणपत्र या कार्यालयास दि.२०/१२/२०११ पर्यंत सादर करण्यात यावे.

**का.प्र.मा.नों.म.नि.**
**यांचे सहीची असे.**

**सही/-**
**नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक,**
**महाराष्ट्र राज्य, पुणेकरिता...**

**प्रत :-** कार्यकारी अभियंता, पुणे विद्युत सार्वजनिक बांधकाम विभाग, पुणे.

२/- त्यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी उपरोक्त प्रमाणे कार्यवाहीच्या सूचना राज्यातील सर्व कार्यकारी अभियंता / उप अभियंता (विद्युत) सार्वजनिक बांधकाम विभाग यांना द्याव्यात.